पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-२७६ ■ शुक्रवार, दि. २४ जानेवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -276 ■ Friday, 24 Jan 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## कामाठीपुरात बांगलादेशी महिलेला लाडकी बहीण योजनेचा लाभ!

मुंबई : देशभरात सध्या बेकायदेशीरित्या भारतात राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांविरुद्ध कठोर कारवाई सुरु आहे. मुंबईसह महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी बेकायदेशीरपणे अनेक बांगलादेशी राहत असल्याचे समोर आले असून पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं आहे. अशातच मुंबईच्या कामाठीपुरा भागातून गेल्या वर्षी सुरु करण्यात आलेल्या महायुती सरकारच्या महत्त्वांकाक्षी लाडकी बहीण योजनेचा बांगलादेशी महिलेने लाभ घेतल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी पाच जणांचा अटक करण्यात आली असून पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरु आहे.

मुंबईत एका बांगलादेशी महिलेने लाडकी बहीण योजनेचा फायदा घेतल्याचे प्रकरण समोर आले आहे. मुंबईतील कामाठीपुरा भागात राहणाऱ्या या बांगलादेशी महिलेने लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केला होता आणि तिला सरकारकडून लाभही मिळाला होता. या प्रकरणी पोलिसांनी महिलेसह ५ बांगलादेशी नागरिक आणि एका दलालाला अटक केली आहे. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. या घटनेमुळे लाडकी बहीण योजनेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

क्राइम इंटेलिजेंस युनिटने कामाठीपुरा भागात ही कारवाई केली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. बांगलादेशी नागरिकांना बेकायदेशीर स्थलांतर करण्यास मदत केल्याबद्दल आणि त्यांना आश्रय दिल्याबद्दल महादेव यादव या ३४ वर्षीय भारतीयालाही या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. ताब्यात घेतलेल्या एका महिलेचे नाव उर्मिला खातून असे असून तिने लाडकी बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपयांचे दोन हप्ते मिळवले असल्याचे समोर आले आहे. या बांगलादेशी महिलेचे आधारकार्ड बनावट असल्याचा दावा केला आहे.

# बांगलादेश सीमेवर बीएसएफची गस्त वाढवली

### प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर विशेष निर्देश



**कोलकाता (वृत्तसंस्था)**

प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर सीमा सुरक्षा दलाच्या ( बीएसएफ) अतिरिक्त महासंचालकांनी सर्व फील्ड फॉर्मेशन्सना गस्त वाढवण्याचे आणि कुंपण नसलेल्या सीमांवर सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत.

देशाच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनापूर्वी, बीएसएफने भारत-बांग्लादेश आंतरराष्ट्रीय सीमा आणि सीमा चौक्यांच्या कडेकोट सुरक्षेसाठी त्यांच्या सर्व फील्ड फॉर्मेशन्समध्ये 'ऑप्स अलर्ट' सुरू केला आहे. या कालावधीत भारत-बांगलादेश सीमेवर गस्त वाढवण्यात आली आहे. पश्चिम बंगाल ते मेघालयापर्यंत भारताची बांगलादेशशी ४,०९६ किमी लांबीची सीमा आहे. बीएसएफचे मुख्य विशेष महासंचालक (पूर्व कमांड) चे जनसंपर्क अधिकारी यांनी गुरुवारी सांगितले की, या बीएसएफचे अतिरिक्त महासंचालक (पूर्व कमांड) रवी गांधी यांनी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. बीएसएफच्या ऑपरेशनल तयारी आणि धोरणात्मक तैनातीवर लक्ष ठेवण्यासाठी गांधी स्वत: बंगालच्या सीमावर्ती भागाला भेट देत आहेत. अतिरिक्त महासंचालकांनी सर्व फील्ड फॉर्मेशन्सना पाळत ठेवण्याचे निर्देश दिले आहेत आणि विशेषतः नदीच्या किनारी आणि कुंपण नसलेल्या सीमांवर सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत.

अधिकाऱ्याने सांगितले की, 'ऑप्स अलर्ट' सराव दरम्यान, बीएसएफचे जवान सीमेवर आणि सीमेजवळील अंतर्गत भागात विविध सुरक्षा सराव करतील. याशिवाय, सीमेवर घडणाऱ्या घटनांना तोंड देण्यासाठी विविध ऑपरेशनल प्रक्रियेच्या प्रमाणीकरणासह सीमावर्ती लोकसंख्येच्या क्षेत्रांशी संवाद साधण्याचे कार्यक्रमही आयोजित केले जातील. हा 'ऑप्स अलर्ट' सराव बुधवारपासून सुरू झाला असून आगामी ३१ जानेवारीपर्यंत चालणार आहे.

### यावेळी मला सूड उगवून पाहिजे.. सूड, सूड आणि सूड होय सूड

## अमित शाह, मराठी माणसाच्या नादी लागू नका-उद्धव ठाकरे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



बाळासाहेब ठाकरेंच्या जयंती निमित्त आज मुंबईत शिवसेना (ठाकरे) पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यातून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आगमी महापालिका निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत. याबरोबरच ठाकरेंनी भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना इशारा देखील दिला आहे.

आगमी महापालिका निवडणुकां स्वबळावर लढवण्याबद्दल बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, ङ्गयेत्या काही काळात महापालिकेच्या निवडणुका येणार आहेत. मी सगळ्यांशी बोलतो आहे. मुंबई, संभाजीनगर नाशिक सगळ्यांशी बोलून झालं. सगळ्यांचं म्हणणं आहे की एकटं लढा.

कर्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेणारः

पुढे बोलताना ठाकरे समोर उपस्थित कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले की,ताकद आहे? अमित शहांना जागा दाखवणार आहात? ठीक आहेः अजून निवडणूक जाहीर झाली नाही. तुमची जिद्द, तयारी बघू द्याः ज्या भ्रमात आपण राहिलो, त्या भ्रमातून पहिलं बाहेर याः.ज्या क्षणी माझी खात्री पटेल की आपली तयारी झाली आहे, मी कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे निर्णय घेतल्याशिवाय राहणार नाही.

**उद्धव ठाकरेंचे महापालिका निवडणुकीसाठी स्वबळाचे संकेत**

ङ्गपण यावेळी मला सूड उगवून पाहिजे.. सूड, सूड आणि सूड होय सूडः जो महाराष्ट्राच्या पाठीत वार करतो. जो मराठी आईच्या कुशीवरती वार करतो तो गद्दार आणि त्या गद्दाराचा वरदहस्त मला महाराष्ट्रात दिसता कामा नयेङ्क, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

श्रजर तुम्ही सगळे शपथ घेऊन सांगत असाल तर जेव्हा वेळ येईल तेव्हा मी एकटं लढण्याचा निर्णय नक्की घेतल्याशिवाय राहाणार नाहीङ्क, असेही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित शिवसैनिकांना सांगितले.

उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणादरम्यान अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली, ते म्हणाले की, मराठी माणसाच्या नादी लागू नका, जिथे औरंगजेबाला या महाराष्ट्राने झुकवलं तिथे अमित शाह किस झाड की पत्ती? मी मुद्दाम जाहीर सभा घेतली. कारण म्हटलं कळू तरी द्या की माझ्याबरोबर किती लोक राहिले आहेत? अमित शाह तुम्ही माझी जागा ठरवू शकत नाही. कारण माझी जागा ठरवणारी बाळासाहेब ठाकरेंनी दिलेली ही माझी शिवसैनिकांची संपत्ती आहे. जे शिवसेनाप्रमुख बोलायचे की जोपर्यंत तुम्ही शिवसैनिक तोपर्यंत शिवसेनाप्रमुख आहे, तेच मी सांगतो आहे जोपर्यंत तुम्ही आहात तोपर्यंत मी तुमचा पक्ष प्रमुख आहे. गद्दारांनी वार केले तर हा उद्धव ठाकरे संपणार नाही. गद्दारांना गाडूनच मी संपेन अशी गर्जना उद्धव ठाकरेंनी केली.

## 'मधाचे गाव' संकल्पनेवर महाराष्ट्राचा चित्ररथ

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**




▶ नवी दिल्ली : भारतपर्व महोत्सवात महाराष्ट्राचा 'मधाचे गाव' संकल्पनेवर आधारित चित्ररथ असणार आहे. हे प्रदर्शन २६ ते २९ जानेवारी दरम्यान होणार आहे.

लाल किल्ला परिसरात भारतपर्व महोत्सवाचे आयोजन प्रजासत्ताक दिनानिमित्त होणार असून या ठिकाणी महाराष्ट्र राज्याचा 'मधाचे गाव' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ असणार आहे. २६ ते २९ जानेवारी दरम्यान भारतपर्व महोत्सव चालेल.

असा असेल 'मधाचे गाव' चित्ररथ चित्ररथाच्या पुढच्या भागात फुलांनी सजवलेली मधमाशीचे आकर्षक शिल्प बसवले आहे. या मधमाशीभोवती लहान मधमाशा आणि काही फुले भारतपर्व महोत्सव दाखवली आहेत. भव्य मधमाशीच्या पंखांची हालचाल दाखवण्यात आली असून लहान मधमाशा हवेत उडताना दिसतील. चित्ररथाच्या मागील भागात एक विशाल मधमाशाचे पोळे चित्रित करण्यात आले आहेत. नैसर्गिकरीत्या असणाऱ्या मधमाशींच्या पोळ्याची अचूक प्रतिकृती बनविली आहे. मधमाशा त्यांच्याभोवती फिरताना दिसतात. मध उत्पादनाचे टप्पे मोठ्या मधाच्या पोळ्याजवळ दाखवले आहेत. मध व्यवसायातील महत्त्वपूर्ण उप-उत्पादने देखील दर्शविली आहेत. फुलांच्या परागीकरणातून रस शोषून घेणाऱ्या मधमाशीची प्रतिकृती दर्शविण्यात आली आहे.

## हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना जन्मदिनानिमित्त अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना जन्मदिनानिमित्त अमरप्रित चौकात अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना प्रमुखांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून जयजयकार करण्यात आला.

शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या प्रमुख उपस्थित झालेल्या कार्यक्रमास शेकडो शिवसैनिक अभिवादन कार्यक्रमात सहभागी झाले. तसेच जिल्हाभरात शिवसेनेतर्फे सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले होते.

अभिवादनप्रसंगी सहसंपर्कप्रमुख विजयराव साळवे, महानगरप्रमुख राजू वैद्य, भारतीय कामगार सेनेचे प्रभाकर मते पाटील, एसटी कामगार सेनेचे शिवाजीराव बोर्डे पाटील, उपजिल्हाप्रमुख आनंद तांदूळवाडीकर, गणू पांडे, संतोष खेडके, विजय वाघमारे, संतोष जेजुरकर, लक्ष्मीनारायण बाखरिया, किशोर कच्छवाह, विधानसभा संघटक दिग्विजय शेरखाने, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, उपशहरप्रमुख नारायण जाधव, जयसिंग होलीये, राजेंद्र दानवे, माजी नगरसेवक मकरंद कुलकर्णी, वीरू गादगे, सचिन खैरे, आत्माराम पवार,

**जिल्हाभरात शिवसेनेतर्फे सामाजिक उपक्रमाचे आयोजन**



वसंत शर्मा, बाळू गडवे, सुभाष शेजवळ, विशाल खंडागळे, सुदाम मंडे, गिरीश चपळगावकर, देविदास वानखेडे, गौरव पुरंदरे, संजय हरणे, नितीन पवार, सुभाष आवटे, राहुल दहातोंडे, शेख रब्बानी, सुधीर जाधव, जगदीश वेताळ, तुकाराम गादु, नीरज ब्रम्हभट, ज्ञानेश्वर साठे, कुणाल पाठक, बजरंग पाटील, रतन नलावडे, श्रीराम धांडे, सोपान बांगर, प्रशांत भगत, सुदाम चव्हाण, प्रकाश मगरे, नरहरी पवार, अख्तर शेख, सुधीर बाहेकर, नारायण कानकाटे, किरण गणोरे, मजहर खान, सुनील धात्रक, लालबहादूर यादव, महेंद्र गांगुर्डे, अब्दुल जब्बर, शेख सय्यद, शंकर राठोड, नानासाहेब रणयेवले, मोहंमद रफिक, बापू कवळे, कैलास काथार, निवृत्ती पळसकर, विलास गोर्डे, अंकुश ठोंबरे, दिनेश राजेभोसले, सुनील गोडबोले, विनोद लोखंडे, सतीश कटकटे, कान्हूलाल चक्रनारायण, प्रशांत ताठे, विलास निकम, नाथा वखरे, महिला आघाडीच्या सुनीता देव, अनिता मंत्री, दुर्गा भाटी, आशा दातार, लता पगारे, नलिनी बाहेती, सुकन्या भोसले, मीरा देशपांडे, सुनीता सोनवणे, रेखा शाह, भागुबाई शिरसाठ, सुनीता औताडे, कमल पिंपरे, शोभा बडे, मीना खोतकर, निर्मला मोगल, सुनीता शिरसाठ, अरुणा पुणेकर, लता संकपाळ, अरुणा भाटी, अर्चना काथार, अरुणा राऊत, संगीता नरवडे, संध्या कोल्हे, सुचिता आंबेकर, रुपाली मुंदडा, सुनंदा खरात, बबिता रणयेवले, संगीता नरवडे, कोंडाबाई रिठे, नेहा आरते आदी उपस्थित होते.

## विमान अपघातांचे आव्हान

काही दिवसांपूर्वी दक्षिण कोरियात एक प्रवासी विमानाला भीषण अपघात झाला. या विमानात कर्मचाऱ्यांसह १८१ जण होते. मुआन विमानतळावर उतरताना विमानाला अचानक आग लागली आणि तीव्र घर्षण आणि आगीमुळे १७९ जणांचा मृत्यू झाला. यात ८५ महिला आणि ८४ पुरुषांचा समावेश होता. यातील दहा जणांची ओळख पटवताना बरेच दिव्यातून जावे लागले. या घटनेत केवळ दोन मुले वाचली. स्थानिक वायटीएन टेलिव्हिजनने प्रसारित एका व्हिडिओत जेजू एअर नावाचे विमान हे विमानतळाच्या धावपट्टीवर अचानक घसरते आणि ते एका भिंतीला धडकते. हा पहिला व्हिडिओ होता. दुसरा व्हिडिओ अपघातानंतरचा आहे. यात विमानाचे दोन तुकडे झाल्यानंतर आग आणि प्रचंड काळा धूर दिसतो. अग्निशमन दलाने या अपघातात विमान पूर्णपणे जळून खाक झाल्याचे सांगितले.

दक्षिण कोरियात घडलेल्या आतापर्यंतच्या मोठ्या विमान अपघातांपैकी एक घटना मानली जात आहे. कोरियाच्या दळणवळण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमान हे पंधरा वर्षे जुने बोइंग ७३७-८०० श्रेणीतील जेट विमान होते आणि ते बँकॉकहून परतत होते. हा अपघात नेमका कशामुळे झाला, हे मात्र अद्याप कळू शकले नाही. याबाबत अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. पक्षी विमानाला धडकला असेल, धावपट्टीवर उतरताना वेगावर नियंत्रण ठेवणाऱ्या उपकरणात तांत्रिक बिघाड झाला असेल किंवा धावपट्टीवर अनपेक्षित अडथळा आला असेल किंवा विमान जुने असल्याने त्याचा एखादा भाग अचानक निखळला असेल किंवा सैल झाला असेल किंवा वैमानिकाकडून काही चूक झाली असेल अशी असंख्य कारणे सांगितली जात आहेत. पण कारण कोणतेही असो, त्याचा परिणाम भयावह आणि दुःखद करणारा आहे. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांच्या नातेवाइकांची स्थिती अतिशय वाईट असून त्यांचा अजूनही या घटनेवर विश्वास बसत नसल्याचे चित्र होते. त्यांना प्रचंड मानसिक धक्का बसला असून काही वेळापूर्वी संवाद साधलेला असताना अचानक एका अपघातामुळे निघून जाणे हे त्यांना क्लेषदायक ठरले. एवढेच नाही तर न सापडलेल्या मृतदेहांच्या किंवा ओळख न पटलेल्या नातेवाइकांची स्थिती तर आणखीच शोचनीय आहे.

वास्तविक सध्या दिवसेंदिवस जीवनमान आधुनिक होत असताना जगातील बहुतांशी व्यक्ती हे कोणाप्रती सहानुभूती ठेवत नाहीत. पूर्वी परिचयातील व्यक्ती एखाद्या दुर्दैवी घटनेत गेली तरी अस्वस्थ वाटत होते. आता तीही भावना दिसत नाही. दक्षिण कोरिया, जग, हवाई वाहतूक कंपन्यामध्ये, विमानांची निर्मिती करणाऱ्या कंपन्यात आणि अपघाताची बातमी कळाल्यानंतर लोकांच्या मनात या घटनेबद्दल संवेदनशील भावना निर्माण झाल्याचे दिसले नाही. केवळ औपचारिकपणे श्रद्धांजली वाहिली गेली आणि सर्वजण आपापल्या कामात व्यग्र झाले. प्रत्यक्षात माणसाला एका मर्यादेपर्यंत काम करता येऊ शकते आणि हे सत्य स्वीकारण्याची तयारी सध्यातरी कोणालाही दिसत नाही. विशेषतः आधुनिक तंत्रज्ञानाच्या बळावर उड्या मारणारी मंडळी संपूर्ण आकाश कवेत घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. परंतु ते शक्य नाही, हे मान्य करायला तयार नाहीत. अशा कृतीतूनच अपघात होण्याची शक्यता राहते आणि त्यानंतर सर्वांना आपल्याला मर्यादेची जाणीव होते. एका क्षणासाठी देदीप्यमान विकास हा आकर्षक वाटतो. परंतु, दीर्घकाळात तीच यंत्रणा या आधुनिक विकासाची कास धरलेल्या माणसांना गिळंकृत करण्याचा प्रयत्न करताना दिसते.

आपल्याकडे सर्व प्रश्नांची उत्तरे आहेत आणि सर्व समस्या चुटकीसरशी सोडवू अशा भ्रमात राहणारा समाज, कोरियाचे शासक आणि प्रशासन हे जेव्हा अपघात झाला तेव्हा भानावर आले. अशावेळी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांचे मृतदेह स्वीकारण्याशिवाय पर्याय राहिला नाही. त्यांनी अपघाताचा व्हिडिओ पाहिला, पण कोणी काहीच करू शकत नाही. काही अपघात एवढे भयंकर असतात आणि त्यात विमानाचा एक तुकडाही सापडत नसेल आणि प्रवासीही गायब होत असतील आणि प्रचंड शोध घेऊनही हाती काहीच लागले नसेल तर त्यांच्या नातेवाइकांची काय स्थिती असेल?

आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेकडील उपलब्ध आकडेवारीनुसार, १९ व्या शतकात २८ जून १८५६ पासून ते १४ जुलै १८९७ पर्यंत पाच विमाने अपघातग्रस्त किंवा बेपत्ता झाली होती. विसाव्या शतकात १९०१ ते १९१९ पर्यंत एकूण १३ विमाने दुर्घटनाग्रस्त झाली. यातील अकरा जण गूढरीत्या गायब झाले. या शतकात १९२० आणि १९३९ या कालावधीत ४९ विमान अपघात झाले आणि त्यापैकी १९५ प्रवाशांचा अद्याप शोध लागलेला नाही. जसजसे जगातील तंत्रज्ञान, औद्योगिक, यांत्रिक यात प्रगती होत आहे, त्याच वेगाने विमान अपघात होण्याचे किंवा दुर्घटनेत बेपत्ता होण्याचे प्रमाणही वाढले आहे.

१९४० आणि १९५९ या कालावधीत ७५ अपघातांची नोंद झाली. यात ११६० जण बेपत्ता झाले. १९६० ते १९७९ च्या मध्यापर्यंत ४६ विमाने कोसळली.

# भारतीय गूढवादी गुरू व आध्यात्मिक शिक्षक!

### (ओशो पुण्यस्मरण विशेष)

ओशो हे भारतीय गूढवादी, गुरू आणि आध्यात्मिक शिक्षक होते. चंद्र मोहन जैन असे जन्मनाव असणारे, सन १९६०पासून आचार्य रजनीश म्हणून, सन १९७० व १९८०च्या दशकांमध्ये भगवान श्री रजनीश आणि सन १९८९पासून ओशो म्हणून ओळखले जाणारे ओशो हे आंतरराष्ट्रीय अनुयायी मिळवणारे महान संत होत. तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक असणाऱ्या ओशोंनी सन १९६०च्या दशकात सार्वजनिक वक्ते म्हणून भारतभर प्रवास केला. समाजवाद, महात्मा गांधी आणि संस्थात्मक धर्मांवर उघड टीका केल्याने ते वादग्रस्त ठरले होते. लैंगिकतेसंबंधी अधिक उदारवृत्ती स्वीकारण्याच्या त्यांच्या आग्रहामुळे त्यांना आधी भारतीय आणि नंतर आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये सेक्स गुरू अशी उपाधी मिळाली. सन १९७०मध्ये काही काळासाठी ते मुंबईत थांबले. तेथे त्यांनी शिष्य जमविण्यास, नवसंन्यासी आणि आध्यात्मिक शिक्षक म्हणून भूमिका बजाविण्यास सुरुवात केली. आपल्या व्याख्यानांमध्ये त्यांनी धार्मिक परंपरांमधील लिखाणे, गूढवाद्यांचे लेखन व जगभरातील तत्त्वज्ञांच्या लिखाणाचे पुनरार्थबोधन केले. पुण्यात जाऊन १९७४मध्ये त्यांनी आश्रम स्थापला. अनेक पाश्चात्त्य लोक या आश्रमामध्ये येऊ लागले. या आश्रमात ह्युमन पोटेन्शियल मूव्हमेन्टवर आधारलेल्या उपचारपद्धती पाश्चात्त्य पाहुण्यांना दिल्या जाऊ लागल्या. मुख्यतः मुक्त वातावरण व ओशोंच्या सडेतोड व्याख्यानांमुळे देश-परदेशांत हा आश्रम गाजू लागला. सत्तरच्या दशकाच्या अखेरीस भारत सरकार, सभोवतालचा समाज व आश्रम यांच्यामध्ये ताणतणाव निर्माण झाले होते. सविस्तर माहिती वाचा, श्री कृष्णकुमार निकोडे गुरुजींच्या या लेखातून... संपादक.

मध्यप्रदेश राज्यातील रायसेन जिल्ह्यात असलेल्या कुचवाडा नावाच्या खेड्यात- आईच्या आजोळी तारणपंथी जैन कुटुंबात दि.११ डिसेंबर १९३१ रोजी चंद्र मोहन जैन ऊर्फ ओशो यांचा जन्म झाला. त्यांचे वडील बाबुलाल जैन हे कापडाचे व्यापारी होते. ओशोंनंतर त्यांना आणखी दहा अपत्ये झाली. ओशोंच्या आईचे नाव सरस्वती होते. वयाच्या सातव्या वर्षापर्यंत ओशो आजोळीच राहिले. खुद्द ओशोंच्या म्हणण्यानुसार आजीने दिलेल्या मोकळकिीचा त्यांच्या जडणघडणीवर परिणाम झाला. सातव्या वर्षी आजोबांचे निधन झाल्यानंतर ओशो गदरवारा येथे आपल्या आईवडिलांसोबत राहावयास गेले. आपल्या आजोबांच्या निधनाचा ओशोंच्या मनावर खोल परिणाम झाला होता. ओशो १५ वर्षांचे असताना त्यांची बालपणातील मैत्रीण आणि चुलतबहीण शशी हिचा विषमज्वर होऊन मृत्यू झाला. मृत्यूच्या या दर्शनाने ते बालपणात व तारुण्यात मृत्यूविषयी अधिक चिंतन करू लागले. शाळेत असताना ते बंडखोरपणे वागत असले तरी त्यांच्यातील प्रतिभा व दर्जेदार वाद-प्रतिवाद करण्याची त्यांची क्षमता लपून राहिली नाही. ते इ.स.१९५१मध्ये वयाच्या एकोणिसाव्या वर्षी जबलपूरमधील हितकारिणी कॉलेजमध्ये महाविद्यालयीन शिक्षणासाठी दाखल झाले. निदेशकाशी झालेल्या शाब्दिक चकमकीनंतर त्यांना कॉलेज सोडावे लागले आणि जबलपूरमध्येच डी.एन.जैन कॉलेजात ते स्थलांतरित झाले. अध्यापकांशी निरंतर वाद घालण्याच्या सवयीमुळे कॉलेजमधील उपस्थितीतून त्यांना सूट मिळाली. केवळ परीक्षेसाठीच कॉलेजमध्ये यावे अशा सूचना मिळाल्याने रिकाम्या वेळात ओशो एका स्थानिक वृत्तपत्रात सहायक संपादक म्हणून काम पाहू लागले. जबलपूरमध्ये दरवर्षी तारणपंथी जैन समुदायाचे सर्वधर्म संमेलन आयोजिले जाते. या संमेलनात भाषणे करण्यास त्यांनी सुरुवात केली. इ.स.१९५१ ते १९६८ या काळातील संमेलनांमध्ये ते सहभागी झाले. विवाहासाठी माता-पित्यांनी टाकलेल्या दबावास ते बळी पडले नाहीत. नंतरच्या काळात त्यांनी दिलेल्या माहितीनुसार दि.२१ मार्च १९५३ रोजी वयाच्या एकविसाव्या वर्षी जबलपूरमधील भंवरताल गार्डनमध्ये एका वृक्षाखाली बसले असताना त्यांना ब्रह्मज्ञान प्राप्त झाले.

डी.एन.जैन कॉलेजात सन १९५५मध्ये ओशो बीए- तत्त्वज्ञान झाले. सागर विद्यापीठातून सन १९५७मध्ये ते विशेष प्रावीण्यासह एमए- तत्त्वज्ञान झाले. रायपूर संस्कृत कॉलेजमध्ये लागलीच त्यांना अध्यापकाचे पद मिळाले पण विद्यार्थ्यांच्या नैतिकतेला, चारित्र्याला व धर्माला त्यांच्यामुळे धोका असल्याचे वाटल्याने उपकुलगुरूंनी त्यांना बदली करवून घेण्याचा सल्ला दिला. सन १९५८पासून ते जबलपूर विद्यापीठात अधिव्याख्याता म्हणून काम करू लागले. सन १९६०मध्ये त्यांना प्राध्यापक म्हणून बढती मिळाली. विद्यापीठातील कर्तव्ये सांभाळून ओशोंनी समांतरपणे आचार्य रजनीश- आचार्य म्हणजे गुरू. रजनीश हे त्यांचे बालपणातील टोपणनाव होते म्हणून भारतभर प्रवास करून समाजवाद आणि महात्मा गांधी यांचे परीक्षण करणारी व्याख्याने दिली. समाजवादाने केवळ दारिद्र्याचेच समाजीकरण होईल आणि गांधी हे दारिद्र्याची पूजा करणारे आत्मपीडक प्रतिक्रियावादी आहेत, असे ते मत मांडू लागले. मागासलेपणातून बाहेर पडण्यासाठी भारताला भांडवलवाद, विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान व लोकसंख्या नियंत्रणाची गरज असल्याचे त्यांचे मत होते. पारंपरिक भारतीय धर्म मृतवत आहेत, त्यांच्यात पोकळ धर्मकांडे आहेत, अनुयायांचे ते शोषण करतात, अशी ते जहरी टीका करू लागले. अशा वक्तव्यांमुळे ते वादग्रस्त ठरले, मात्र ओशोंना काही निष्ठावान अनुयायीही मिळाले. अशा अनुयायांमध्ये बरेच श्रीमंत व्यापारी आणि उद्योगपती होते. अशा अनुयायांनी देणग्या देऊन ओशोंकडून आध्यात्मिक प्रगतीसाठी व दैनंदिन जीवनासाठी सल्ले घेण्यास सुरुवात केली. हळूहळू हे लोण देशभर पसरले. सन १९६२पासून त्यांनी तीन ते दहा दिवसांची ध्यान शिबिरे घेण्यास प्रारंभ केला आणि नंतर जीवन जागृती आंदोलन म्हणून विख्यात झालेली ध्यानकेंद्रे उदयास आली. सन १९६६मधील एका वादग्रस्त व्याख्यान सत्रानंतर विद्यापीठाच्या विनंतीनुसार त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

दि.२८ ऑगस्ट १९६८मध्ये मुंबईच्या भारतीय विद्या भवन सभागृहात प्रेम या विषयावरील पाच व्याख्यानांच्या मालिकेतील पहिले व्याख्यान ओशोंनी दिले. लैंगिक ऊर्जेच्या रूपांतरणातूनच प्रेम आणि ध्यान निर्माण होतात, असे त्यांनी म्हटले. लोकांमधून या मतावर संतप्त प्रतिक्रिया आल्या. आयोजकांनी व्याख्यानमाला रद्द केली. बरोबर एका महिन्यानंतर मुंबईतच गवालिया टँक मैदानावर प्रचंड श्रोतृसमुदायासमोर त्यांनी व्याख्याने देऊन मालिका पूर्ण केली. नंतर संभोगातून समाधीकडे या नावाने प्रकाशित झालेल्या या व्याख्यानमालेमुळे भारतीय माध्यमांनी त्यांना सेक्स गुरू अशी उपाधी दिली. सन १९६९मध्ये झालेल्या दुसऱ्या जागतिक हिंदू परिषदेत त्यांनी धर्मगुरूंवर स्वार्थीपणाचा आरोप केला आणि धर्म म्हणजे जीवनाचा आस्वाद कसा लुटावा हे शिकवणारी कला आहे, असे मत मांडले. त्यांच्या भाषणादरम्यान संतप्त झालेल्या पुरीच्या शंकराचार्यांनी भाषण थांबविण्याचा असफल प्रयत्न केला. सन १९७०मधील एका वसंतकालीन ध्यान शिबिरात ओशोंनी डायनॅमिक मेडिटेशन पद्धत प्रथम सादर केली. जूनच्या अखेरीस मुंबई सोडून ते जबलपूरला निघाले. दि.२६ सप्टेंबर १९७० रोजी त्यांनी नवसंन्यासींचा पहिला गट स्थापन केला. ओशोंचे शिष्य अर्थात नवसंन्यासी होणे याचा अर्थ नवे नाव स्वीकारणे, विरागी हिंदू साधूंप्रमाणे नारिंगी वस्त्रे परिधान करणे असा होता. वैराग्यापेक्षा उत्सवपूर्ण जीवनशैली स्वीकारण्यास या नवसंन्यासींना प्रोत्साहन दिले जाई.

स्वतः संन्याशाची पूजा होणे अभिप्रेत नव्हते, तर फुलाला उमलण्यास उत्तेजन देणारा सूर्य, अशी त्यांना भूमिका पार पाडावयाची होती. इथवरच्या काळात सचिव म्हणून कार्य करणाऱ्या लक्ष्मी ठाकरसी कुरुवा या त्यांच्या पहिल्या शिष्या ठरल्या आणि त्यांनी मा योगलक्ष्मी हे नाव घेतले. लक्ष्मींचे वडील धनवान होते आणि ओशोंचे अनुयायी होते. लक्ष्मींनीच पैसे उभे करून ओशोंचे प्रवास थांबविले. डिसेंबर १९७०मध्ये ओशो मुंबईतील वुडलँड्स अपार्टमेंटमध्ये निवासास गेले व व्याख्याने देत अभ्यागतांना भेटू लागले. येथेच त्यांना प्रथम पाश्चात्त्य श्रोते लाभले. यानंतर ओशोंचा प्रवास आणि सार्वजनिक सभांमधील व्याख्याने जवळजवळ बंद झाली. सन १९७१मध्ये त्यांनी भगवान श्री रजनीश ही उपाधी स्वीकारली. श्री हा सन्मानसूचक शब्द आहे तर भारतीय परंपरेमध्ये ज्या व्यक्तीमधील देवत्व लपून राहिलेले नाही, स्पष्ट दिसू लागले आहे, अशी व्यक्ती म्हणजे भगवान ठरते.

मुंबईच्या दमट जल वायुमानामुळे ओशोंना मधुमेह, दमा आणि विविध प्रतिक्रियात्मक आजार, अशा व्याधी जडल्या. सन १९७४मध्ये ते पुण्यातील कोरेगाव पार्कमध्ये निवासास आले. मा योगमुक्ता- कॅथरीन व्हेनिझिलोस हिच्या मदतीने त्यांनी ही जागा विकत घेतली होती. येथे सन १९८१पर्यंत ते शिकवीत राहिले. ही जागा आजच्या ओशो आंतरराष्ट्रीय ध्यानकेंद्राच्या मध्यभागी आहे. या जागेवरच ध्वनिमुद्रण आणि नंतर ध्वनिचित्रमुद्रण सुरू झाले. त्यांच्या व्याख्यानांचे मुद्रणही येथेच सुरू होऊन त्यांच्या शिकवणीचा प्रचार-प्रसार वाढला. पाश्चिमात्य अभ्यागतांची संख्या खूप वाढली. या जागेवर नंतर कपडे, दागदागिने, मृत्तिकाशिल्पे व सेंद्रिय सौंदर्यप्रसाधने बनविणारे केंद्र उभे राहिले. रंगमंच, संगीत व मूकाभिनयाचे कार्यक्रम येथे होऊ लागले.

सन १९७५नंतर पुण्यात ह्युमन पोटेन्शिअल मूव्हमेंटमधील मानसोपचारक आले आणि ध्यानासह उपचारपद्धती हा आश्रमाच्या मिळकतीचा मोठा स्रोत ठरला. पुण्यातील आश्रम ही एक गजबजलेली जागा होती. सकाळी ध्यान, मग बुद्ध हॉलमध्ये एक ते दीड तासांची त्यांची विविध विषयांवरील व्याख्याने व प्रश्नोत्तरे; दिवसभर विविध उपचार, रात्री शिष्यांशी आणि श्रोत्यांशी वैयक्तिक संवाद, नव्या शिष्यांना दीक्षा देणे, असे कार्यक्रम असत. कोणत्या मानसोपचारांत सहभागी व्हावे? याबाबत लोक त्यांचा सल्ला घेत किंवा स्वतःच निवड करीत. आश्रमातील प्रारंभीचे काही उपचारगट हे प्रयोगात्म होते. काही गटांमध्ये शारीरिक आक्रमकतेला तसेच लैंगिक आक्रमकतेलाही थोडीफार मुभा होती. अशा काही गटांच्या उपचारांदरम्यान झालेल्या जखमांचे उलटसुलट तपशील वृत्तपत्रांमध्ये येऊ लागले. जाने.१९७९मध्ये उपचारगटांतील हिंसा संपुष्टात आली. नंतरच्या काळातही आश्रमातील रहिवाशांकडून मादक द्रव्यांचा वापर, वेश्याव्यवसायासारखे प्रकार यांमुळे हा आश्रम वादग्रस्तच राहिला. सत्तरीच्या दशकाच्या अखेरीस हा आश्रम त्यांना अपुरा वाटू लागला, पर्यायी जागेसाठी चाचपणी सुरू झाली. आश्रम हलविण्यास त्यांचा मानस कधीच प्रत्यक्षात उतरू शकला नाही. मोरारजी देसाई यांचे जनता पक्ष सरकार आणि आश्रमातील तणावाचे संबंध त्यासाठी कारणीभूत ठरले. भूमी-वापराची मान्यता रद्द केली गेली आणि पूना आश्रम हे मुख्य गंतव्यस्थान दाखविणाऱ्या परदेशी अभ्यागतांना प्रवेशपत्र देणे सरकारने बंद केले. देसाई सरकारने पूर्वलक्ष्यी प्रभावाने आश्रमाची कर-सवलत रद्द करून अंदाजे पन्नास लाख रुपयांचा बोजा आश्रमावर पाडला. विविध धार्मिक नेत्यांशी असलेले मतभेदही आश्रम-स्थलांतराच्या आड आले. दि.२२ मे १९८० रोजी सकाळच्या व्याख्यानादरम्यान विलास तुपे नावाच्या हिंदू मूलतत्त्ववाद्याने ओशोंच्या दिशेने चाकू फेकला. स्थानिक पोलिसांना आधीच सुगावा लागलेला असल्याने ते सभागृहात हजर होते. पोलिसांनी तुपेला ताब्यात घेतल्यानंतर ओशोंनी व्याख्यान सुरूच ठेवले होते.

सन १९८१मध्ये ओशो अमेरिकेत स्थलांतरित झाले. ऑरेगॉन राज्यात त्यांच्या अनुयायांनी स्थापन केलेला सहेतुक समाज पुढे रजनीशपुरम म्हणून नावारूपाला आला. वर्षभरात या कम्यूनचा स्थानिक रहिवाशांशी जमिनीवरून कटू वाद उभा राहिला. अनुयायांनी ओशोंना वापरासाठी खरेदी करून दिलेल्या रोल्स-रॉयसही कुप्रसिद्ध ठरल्या. सन १९८५मध्ये कम्यूनच्या नेतृत्वाने जैवदहशतवादी हल्ल्यासारखे गंभीर गुन्हे केल्याचे ओशोंनी उघड केल्यावर ऑरेगॉन कम्यून कोसळले. लवकरच ओशोंना अटक झाली आणि देशागमनादरम्यान केलेल्या नियमभंगाचा आरोप त्यांच्यावर लागला.

युक्तिवादाच्या तडजोडीनुसार ओशोंना अमेरिका सोडावी लागली. एकवीस देशांनी त्यांना प्रवेश नाकारला व जगभ्रमंतीनंतर ते पुण्यात आले. दि.१९ जानेवारी १९९०मध्ये त्यांचे पुण्यात निधन झाले. आज त्यांचा आश्रम ओशो आंतरराष्ट्रीय ध्यान केंद्र म्हणून ओळखला जातो. ओशोंच्या बहुमिश्र शिकवणीमध्ये ध्यान, जागृतता, प्रेम, उत्सव, धैर्य, सृजनशीलता आणि विनोद यांना महत्त्व आहे. स्थितिशील श्रद्धा, धार्मिक परंपरा आणि समाजीकरणामुळे या बाबी दबल्या जातात असे त्यांचे मत होते. पाश्चात्त्य नवयुग विचारांवर ओशोंच्या विचारांचा पगडा दिसतो. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विचारांची लोकप्रियता वाढलेलीच दिसत आहे.

!! पावन पुण्यस्मरण दिनी आचार्य रजनिशांना विनम्र अभिवादन !!

# सराईत गुन्हेगाराकडून चोरीचा १६ लाखांचा ऐवज जप्त

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

गुन्हे शाखेच्या पथकाने हर्सूल कारागृहातून सराईत चोरट्याला ताब्यात घेऊन अटक केली आहे. आरोपी निसार अहमद उर्फ सलमान दुल्हन गफार पठाण (वय २६, रा. संजय नगर, गल्ली क्र. ११) याने पाच दुकानफोड्या केल्याची कबुली दिली आहे. त्याच्याकडून १६ लाख ६९ हजार ७६९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्त केलेल्या वस्तूंमध्ये ४९ मोबाईल, ८० घड्याळे, ५५ इंची टीव्ही, कपडे, परफ्युम्स, ब्लँकेट्स यांचा समावेश आहे. गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त प्रशांत स्वामी, पोलिस निरीक्षक संदीप गुरमे, सहायक निरीक्षक रविकांत गच्चे आणि हवालदार प्रकाश गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.



उस्मानपुरा पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यात आरोपीला अटक केली होती. न्यायालयीन कोठडीत असताना गुन्हे शाखेच्या पथकाने अधिक माहिती मिळवत त्याला हर्सूल कारागृहातून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान, निसार अहमद याने जवाहरनगर, उस्मानपुरा, एमआयडीसी वाळूज आणि ग्रामीण सिल्लेगाव येथे चोरी केल्याचे कबुल केले. चोरीचा ऐवज लपवण्यासाठी त्याने जोगेश्वरी येथे भाड्याने खोली घेतली होती.

आरोपीला जुगाराचे व्यसन होते. पैशांची गरज भागवण्यासाठी तो चोरी करत असे आणि नंतर मुद्देमाल विकून आपल्या हौशी भागवत असे. आरोपीविरोधात जिन्सी, एमआयडीसी सिडको, ग्रामीण सिल्लेगाव आणि उस्मानपुरा पोलिस ठाण्यात एकूण पाच गुन्हे दाखल आहेत. सध्या आरोपीचा साथीदार अद्याप फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

## रस्ता दुभाजक तोडणाऱ्यांवर पोलीस;परिवहन आणि साबांविने संयुक्त कारवाई करावी- जिल्हाधिकारी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

नागरिकांच्या जीवितास प्राधान्य देण्यासाठी दुभाजक तोडणे, गतिरोधकाची उंची प्रमाणापेक्षा जास्त किंवा कमी करणे अशी बेकायदेशीर कृत्य करणारे व्यावसायिक, पेट्रोलपंप चालक, हॉटेलचालक यांच्यावर परिवहन,पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी संयुक्तपणे कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आज पार पडली. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, मुख्य कार्यकारी अभियंता अशोक येरेकर, रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता हिमांशू पाटील, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी अनिल थोरात ,राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता सूर्यकांत गलांडे, जागतिक बँक प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता एम. एन सूर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, मोटार वाहन निरीक्षक योगेश सापिके यांच्या सह जिल्हा रस्ता सुरक्षा समितीचे सदस्य बैठकीस उपस्थित होते.

जिल्ह्यातील विविध रस्त्यावरील एकूण ९७ संभाव्य धोक्याची ठिकाणे अधिसूचित केले आहे. या ठिकाणी उपाययोजना म्हणून गतिरोधक ,रस्त्यावर विविध खुणा, दिशादर्शक फलक, पांढऱ्या पट्टे, दुभाजक यासारख्या उपाययोजना करण्यात येणार आहेत. यासाठी विविध स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्य घेतले जाणार आहे. शाळेसाठी असणाऱ्या विविध स्कूल बसेसची तपासणी करण्याची मोहीम हाती घ्यावी. वाहनांच्या तपासणी बरोबरच वाहन चालकाची देखील आरोग्याची तपासणी करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिल्या. एसटी महामंडळाच्या बस स्टॅन्ड ठिकाणी वाहकांची देखील आरोग्य तपासणीसाठी शिबिर आयोजित करण्याचे निर्देश आरोग्य विभाग ,महानगरपालिका व जिल्हा परिषद यांना देण्यात आले.

राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्ग रस्त्याला जोड रस्ता असणाऱ्या ठिकाणी दुभाजक किंवा गतिरोधक असणे आवश्यक आहे.अशा ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राज्य रस्ते विकास महामंडळ. सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस प्रशासन आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी संयुक्तपणे काम करावे. ज्या ठिकाणी पेट्रोल पंप किंवा हॉटेल चालकांनी रस्त्यावरील दुभाजक तोडले आहेत येथे पोलीस विभागामार्फत फौजदारी गुन्हे दाखल करून संबंधित व्यावसायिक यांच्याकडून दुभाजक त्यांच्याकडून दुरुस्त करून घेण्याची कारवाई करावी. त्याचप्रमाणे पेट्रोल पंपाच्या शेजारी जर असे करण्यात आले असेल तर पेट्रोल पंप चालकांना कायदेशीर नोटीस देऊन गुन्हा दाखल करावा. विविध महाविद्यालयांमध्ये युवकांमध्ये रस्ते अपघात होऊ नये यासाठी जाणीव जागृती पर कार्यक्रमाचे आयोजन करावे. यामध्ये मान्यवर व्यक्तीं मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. उच्चतंत्र शिक्षण विभागाने प्रत्येक महाविद्यालयांमध्ये रस्ता सुरक्षा बाबतचे कार्यक्रम आयोजित करून तरुण मुला-मुलींना रस्ते अपघात रोखण्यासाठी आवश्यक असणाऱ्या जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे निर्देश बैठकीत जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

शहरामध्ये होणारे जास्तीत जास्त अपघात हे ऑटोरिक्षांमुळे व ऑटो रिक्षा अयोग्य चालवण्याच्या पद्धतीमुळे होतात. यासाठी ऑटो रिक्षा चालकांचे समुपदेशन आणि आरोग्य तपास शिबिर आयोजित करण्याचे निर्देश महापालिका आणि आरोग्य तसेच पोलीस विभागांना देण्यात आले.चालकाची अल्कोहोल तपासणी, वाहनांची तपासणी. विविध प्रसारमाध्यमातून रस्ता सुरक्षा बाबत जाणीव जागृती पर कार्यक्रमासाठीचे आवाहन, राष्ट्रीय महामार्ग विभाग, पोलीस, परिवहन ,आरोग्य , राज्य रस्ते विकास महामंडळ, या विभागामार्फत करण्यात यावे, आदि सूचनाही जिल्हाधिकारी स्वामी यांनी बैठकीत दिल्या.

## जलसंपदा विभागाचे क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा पारितोषिक वितरण

# महाराष्ट्र जलसमृद्ध करायचाय-डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जलसंपदा विभागामध्ये प्रचंड क्षमता आहे. हा विभाग महाराष्ट्राला जलसमृद्ध करुन शेतकऱ्याला सुखी आणि महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करु शकतो. आपण साऱ्यांनी एकजुटीने काम करावे आणि महाराष्ट्राला जलसमृद्ध करावे,असे आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखेपाटील यांनी केले.

जलसंपदा विभागाच्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळअंतर्गत क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे पारितोषिक वितरण डॉ. विखेपाटील यांच्या हस्ते आज पार पडले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात हा कार्यक्रम पार पडला.

कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ संतोष तिरमनवार,मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, मुख्य अभियंता लाभ क्षेत्र विकास जयंत गवळी, मुख्य अभियंता विजय घोगरे, अधीक्षक अभियंता




इलियास चिस्ती, अधीक्षक अभियंता पल्लवी जगताप, अजय दाभाडे, भारत शिंगाडे यांची उपस्थिती होती.

डॉ. विखे पाटील म्हणाले की, या विभागाच्या कर्मचारी अधिकाऱ्यांचा ताण तणाव निवळावा यासाठी अशा क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वाचे आहे. ताणतणावात काम केल्याने विकासाच्या प्रक्रिया मंदावतात. त्यासाठी परस्पर संवाद वाढविणे आवश्यक आहे. हा संवाद वाढविण्यात अशा सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांचे मोठे योगदान असते. आपला विभाग हा थेट शेतकऱ्यांशी संबंधित असल्याने आपण शेतकऱ्यांशी संवाद वाढवावा. जलसंपदा विभाग हा शेतकरीभिमुख व्हावा, यासाठी माझे प्रयत्न आहेत. सिंचनक्षमता वाढवून आपण महाराष्ट्र दुष्काळमुक्त करु या. त्यासाठी विभागाचा प्रमुख या नात्याने मी सदैव अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहे. पाणी व्यवस्थापन, सिंचनाचे निकष, वॉटर ऑडीट या संकल्पनांवर आपण काम करण्याची गरज असून सिंचनाचे नवे तंत्र आपण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून आहे त्या पाण्याचा अधिक व प्रभावी वापर करण्याविषयी आपण शेतकऱ्यांना प्रशिक्षित केले पाहिजे,असे त्यांनी सांगितले.

राज्यातील सिंचन प्रकल्पांची पूर्ण होण्याची कालमर्यादानिहाय आपण नियोजन केले पाहिजे. यासोबतच पाण्याची गळती सारख्या बाबींवर नियंत्रण मिळवले पाहिजे.

आपल्या विभागाच्या क्षमतेचा पुरेपुर वापर करुन महाराष्ट्र दुष्काळमुक्त करु या,असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन व सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना आजच मानद डॉक्टरेट पदवी मिळाली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यात आला. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले.

## विशेष सहाय्य योजना लाभार्थ्यांना आधार अद्यावतीकरणाचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संजय गांधी निराधार योजना शहर विभाग अंतर्गत विशेष सहाय्य योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान त्यांच्या थेट बँक खात्यात जमा होणार आहे. त्यासाठी आधार कार्डाचे अद्यावतीकरण करणे आवश्यक असून लाभार्थ्यांनी ते त्वरीत करावे,असे आवाहन प्रभारी तहसिलदार उत्तम बहुरे यांनी केले आहे.

संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना अशा विशेष सहाय्य योजनांचे डिसेंबर २०२४ पासून पुढील महिन्यांचे अनुदान थेट डीबीटीद्वारे जमा होणार आहे. त्यासाठी आधार कार्ड हे डीबीटी प्रणालीत अद्यावत करण्याचे काम सुरु आहे. आतापर्यंत एकूण १४ हजार ९०५ लाभार्थ्यांपैकी १४ हजार ४९७ लाभार्थ्यांनी आपली माहिती नोंदविली आहे. या नोंदवलेल्या १४ हजार ४९७ लाभार्थ्यांपैकी १० हजार २०४ लाभार्थ्यांचे आधार अद्यावतीकरण झाले आहे. उर्वरित ४२९३ लाभार्थ्यांनी आपले आधार अद्यावतीकरण केले नसल्याने त्यांना अनुदान प्रदान करणे शक्य होणार नाही. ज्या लाभार्थ्यांचे आधार अद्यावतीकरण बाकी आहे त्यांनी ते त्वरीत करुन घ्यावे. त्यासाठी आपले आधार कार्ड व संलग्नित मोबाईल व्यक्तिशः घेऊन यावे,असे आवाहन प्रभारी तहसिलदार उत्तम बहुरे यांनी केले आहे.

## नेताजी सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

थोर स्वातंत्र्य सैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस तसेच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

अपर आयुक्त सामान्य प्रशासन डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर यांनी प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी यांची यावेळी उपस्थिती होती.

## २६ जानेवारी गणराज्यदिनी होणाऱ्या झेंडावंदन कार्यक्रमाप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो लावण्याकरिता परिपत्रक काढा ...

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा च्या वतीने अपणास निवेदन सादर करण्यात येते की भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो २६ जानेवारी गणराज्यदिनी होणाऱ्या झेंडा वंदन कार्यक्रम प्रसंगी लावण्याकरिता राज्य सरकारने त्वरित परिपत्रक काढून संविधान निर्मात्याचा सन्मान करण्यात यावा, शासकीय,

निमशासकीय, सार्वजनिक ,खाजगी क्षेत्रामध्ये होत असलेल्या झेंडावंदन कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाणूनबुजून टाळण्यात येत असल्याने संविधान निर्मात्याचा घोर अपमान होत



असल्याचे आमच्या संघटनेच्या निदर्शनास कित्येक वर्षापासून येत आहे. २६ जानेवारी १९५० पासून संविधान आपल्या देशात अमलात आल्यामुळे संविधान निर्मात्याचा सन्मान करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.

या करिता आपण या बाबींवर गंभीररित्या विचार करुन राज्यात होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमात संविधान निर्मात्याचा फोटो लावण्याकरिता परिपत्रक काढून आदेश पारित कराल , अशी मागणी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून केली आहे. आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने छ.संभाजीनगर जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी चंद्रकांत सोनवणे, दिनकर नरवडे, सतीश जाधव, राजहंस धूळे हजर होते .

# दावोसमध्ये महाराष्ट्राचाच बोलबाला, महाराष्ट्र भविष्यात डेटा सेंटरचे कॅपिटल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

दावोस मधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या भारताच्या पॅव्हेलियनमध्ये महाराष्ट्राचाच बोलबाला राहिला. यामुळे महाराष्ट्राला जगभरातील विविध उद्योग क्षेत्रातील दिग्गज कंपन्यासमवेत विक्रमी १५ लाख ७५ हजार कोटी रुपयांचे गुंतवणूकीचे सामंजस्य करार करता आले. यातून राज्यात १५ लाख ९८ हजार रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. तसेच दावोस मधील इकॉनॉमी फोरममध्ये सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या जनतेचेही आभार मानले. दावोस मध्ये गुंतवणूकीचे ५४ आणि धोरणात्मक सहकार्याचे ७ असे एकूण ६१ सामजंस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

महाराष्ट्र आता डेटा सेंटरचे कॅपिटल होईल. डेटा हे नव्या युगाचे 'ऑईल' आहे. त्यामुळे या क्षेत्राची वाढ वेगाने होईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. स्वित्झर्लंडमधील दावोस येथून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आज पत्रकारांशी दृकश्राव्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. उद्योग मंत्री उदय सामंत मुंबई येथून सहभागी झाले.

सुरवातीलाच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना जयंती निमित्त अभिवादन केले. तसेच दावोस मध्ये वर्ल्ड इकॉनॉमीक फोरममध्ये देशातील अन्य सहा राज्यांसमवेत सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. दावोसमध्ये यावेळी भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याचा, त्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे विश्वास निर्माण झाल्याचा बदल लक्षात आल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

'कंट्री डायलॉग' या सत्रात आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि तेलंगणांचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांच्या समवेत सहभाग घेतल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले की, यात आम्ही आपआपल्या राज्यांची शक्तीस्थळांची, वेगवेगळ्या राज्यांच्या विकास संकल्पनांची, गुंतवणूकसाठीची संधी याबाबतची माहिती दिली. एक भारत म्हणून सहा राज्यांनी भूमिका मांडत देशात जास्तीत जास्त गुंतवणूक कशी खेचून आणता येईल यासाठी प्रयत्न केले. एका आवाजात एक भारत म्हणून भूमिका मांडली, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

'जल सुरक्षित भविष्यासाठी जागतिक सहकार्य' विषयांमध्ये देश आणि राज्याची भूमिका मांडली. जलयुक्त शिवारसोबतच जलसंधारणाच्या काय उपाययोजना राज्यात केल्या जात आहेत याचे सादरीकरण करता आले. आपापल्या राज्याची ताकद आम्ही येथे दाखवून देऊ शकलो. देशात मोठी गुंतवणूक आकर्षित करण्यासोबतच भारत 'अट्रॅक्टीव्ह इन्व्हेस्टमेंट डेस्टीनेशन' असल्याचे जगाला पटवून देण्यात यश आल्याचेही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रासाठी गुंतवणूकीचे असे विक्रमी सामंजस्य करार झाले याचा आनंद आहे. यातून भारताची आणि पर्यायाने महाराष्ट्राची ताकद वाढते आहे, हे स्पष्ट झाले आहे. अशा प्रकारे देशात होणाऱ्या सामंजस्य करारांचे यश हे चाळीस टक्क्यांपर्यंत असते. पण हेच प्रमाण महाराष्ट्राच्याबाबतीत सुमारे ६५ टक्के आहे. गतवर्षी दावोस मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळात चांगली सुरुवात झाली होती. त्यावेळी झालेल्या करारांची ९५ टक्क्यांपर्यंत अमंलबजावणी झाली आहे. महाराष्ट्राच्या बाबतीत याही वर्षी विविध क्षेत्रात गुंतवणूक येत आहे. त्यातही एमएमआर हे मॅग्नेट समजले जाते. एमएमआरमध्ये सहा लाख कोटींची गुंतवणूक येत आहे. याशिवाय विदर्भ पाच लाख कोटी, उत्तर महाराष्ट्र ३० हजार कोटी तर मराठवाड्याचे मॅन्युफॅक्चरींग हब हे शक्तीस्थळ ठरू लागले आहे. ही सगळी गुंतवणूक थेट विदेशी गुंतवणूक, विदेशी संस्थात्मक गुंतवणूक असते. त्यामुळे देशाची अर्थव्यवस्थाही विस्तारीत होते.

**कृत्रिम बुद्धिमत्ता -एआय, आणि माहिती तंत्रज्ञान**

कृत्रिम बुद्धिमत्तामध्ये महाराष्ट्राला सर्वात पुढे ठेवण्याच्यादृष्टीने अनेक करार दावोस मध्ये करण्यात आले आहेत. यामध्ये गुगलशी करार करण्यात आला आहे. नवी मुंबईमध्ये इनोव्हेशन सिटी निर्माण करून एक परिसंस्था उभी करण्यावर आपण भर दिला आहे. डेटा हे न्यू ऑईल आहे. तेल क्षेत्राप्रमाणेच यात वाढीची मोठी क्षमता आहे. त्यामुळे डेटा सेंटर उभे करण्यावर आणि त्यामध्ये गुंतवणुकदारांना आकर्षित करण्यात आपल्याला यश आले आहे. एआय मध्ये महाराष्ट्राने सर्वात पहिले पाऊल टाकले आहे. गुगलशीही आपण याबाबत एक्सलन्स सेंटर स्थापन करण्याचा करार यापुर्वीच केला आहे. दावोस मध्ये ग्लोबल सीईओंशी चर्चा केल्याने या क्षेत्रातील रोजगार संधीची मोठी क्षमता लक्षात आली.

**पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकास गुंतवणुकीचे करार आणि उद्योग-** आणताना पर्यावरणाचा आपण साकल्याने विचार केला आहे. विशेषतः हरित उर्जा, हायड्रो उर्जा, सौरऊर्जा प्रकल्पांना प्राधान्य दिले आहे. स्वच्छ उर्जेतूनच आपल्याला पर्यावरण रक्षण करता येणार आहे. जलसंवर्धनाच्या क्षेत्रातील महाराष्ट्राचे काम तसेच यातील गुंतवणूकीची माहिती आपण दिली. तसेच ऊर्जा क्षेत्रातील नवे प्रवाह - एनर्जी ट्रान्झिशन मध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. २०२२ मधील १३ टक्क्यांवरून आता आपण २५ टक्के तर २०३० मध्ये ५० टक्क्यांपर्यंचे लक्ष्य गाठणार आहोत. महाराष्ट्र हे ईव्ही सेंटर असेल. त्यामुळे शाश्वत ऊर्जा क्षेत्राच्याबाबतीत आपण सौर ऊर्जे सह अनेक क्षेत्रात काम करत असल्याची मांडणी करता आली.

**विक्रमी गुंतवणूकीसाठी टीमचेही कौतूक -** दावोस दौऱ्यातून गुतंवतणूकीचे विक्रमी उद्दीष्टब साध्य केल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उद्योगमंत्री श्री. सामंत यांच्यासह उद्योग विभाग, एमआयडीसी तसेच सल्लागार संस्था, त्यांचे अधिकारी यांचे अभिनंदन केले आहे. या सर्वांनी या सर्व बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी, विविध यंत्रणांशी चांगला समन्वय, संपर्क ठेवल्याने हे उद्दीष्ट साध्य करता आल्याचे कौतुकोद्गारही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी काढले.

**दावोस मध्ये आज दृष्टिक्षेपातः**

जपानच्या सुमिटोमी समुहाची राज्यातील पायाभूत सुविधा क्षेत्रात ४३ हजार कोटींची गुंतवणूक. एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबईतील पायाभूत सुविधा क्षेत्राच्या प्रगतीला चालना. जपान आणि महाराष्ट्राच्या दरम्यानच्या सौहार्द, सलोख्याचे उत्तम उदाहरण. सुमिटोमी समुहाचे प्रेसिडेंट कोजून निशीमा सॅन यांचे नेहमीच महाराष्ट्र आणि मुंबईकरिता सहकार्य.

### दावोस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच का..?

दावोसमध्ये करार झालेले अनेक उद्योग भारतीयच आहेत तर दावोसमध्येच करार का अशा स्वरूपाचे प्रश्न विचारण्यात येत आहेत. दावोसमध्ये जगभरातील सीईओ येतात. आपल्या कित्येक कंपन्या भारतीय असल्या तरी त्या आता वैश्विक झाल्या आहेत. या कंपन्यांचे विदेशी गुंतवणूकदार- भागिदारांशीही यानिमित्ताने चर्चा करण्यात आली. दावोस हे आंतरराष्ट्रीय नेटवर्कींगचे केंद्र आहे. भारतीय कंपन्यांना करार करताना त्यांचे विदेशी गुंतवणुकदार सोबत असावेत असे वाटणे गैर नाही. महाराष्ट्रात गुंतवणूक होणारी ९५ टक्के गुंतवणूक विदेशी आहे. कराराचे रूपांतर प्रत्यक्षात आणण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. आतापर्यंत देशाचा आणि महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रात सुमारे ६५ ते सत्तर टक्के कराराचे रूपांतर प्रत्यक्ष गुंतवणूक येण्यात झाली आहे. यावेळी सर्वच करार फलद्रुप करण्यावर आमचा भर आहे.

# साई मंदिराच्या सुरक्षा पथकात नव्या श्वानाची एन्ट्री

शिर्डी : शिर्डी येथील साईबाबा मंदिराच्या सुरक्षा पथकात आता 'सिंबा' नावाच्या नव्या श्वानाची एन्ट्री झाली आहे. 'वर्धन' श्वानाने दहा वर्ष सेवा दिल्यानंतर तीन महिन्याचा 'सिंबा' आता बॉम्ब शोधक आणि नाशक पथकात दाखल झाला आहे. सिंबाची बीडीडीएस पथकाकडून ट्रेनिंग सुरू असून लवकरच तो साई मंदिराच्या सुरक्षेसाठी तैनात होणार आहे.

शिर्डी साईबाबा मंदिर हे जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र असल्याने येथे दररोज लाखो भाविक साईबाबांच्या समाधीच्या दर्शनासाठी येतात. याचबरोबर व्हीव्हीआयपी देखील मोठ्या प्रमाणात इथे येत असतात.साई मंदिर आणि परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने साईबाबा मंदिरासाठी स्पेशल बीडीडीएस पथक तैनात करण्यात आले आहे.

साईबाबांच्या मंदिरात होणाऱ्या पहाटेच्या काकड आरती, मध्यान्ह आरती आणि धुपाआरती तसंच रात्रीच्या शेजारतीच्या अगोदर साईच्या समाधी मंदिरासह परिसरातील सर्वच मंदिरात बीडीडीएस पथकाकडून तपासणी केली जाते. बीडीडीएस पथकात पूर्वी 'वर्धन' नावाचा श्वान कार्यरत होता. मात्र,तो सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याच्या जागी आता सिंबा दाखल झाला आहे.

सिंबाचे सध्या साई मंदिर परिसरात प्राथमिक प्रशिक्षण सुरू आहे. लवकरच तो पुणे सीआयडी येथून ट्रेन होऊन साई मंदिराच्या सुरक्षेसाठी तैनात होणार आहे.

गेल्या दहा वर्षांपासून साई मंदिरात वर्धन श्वानाने सेवा दिल्यानंतर आज तो सेवानिवृत्त झाल्याने बीडीडीएस पथकातील अनेकांना अश्रू अनावर झाले होते. पथकाच्या वतीनं वर्धनचा साईबाबांची शाल, फुलांचा हार देऊन सन्मान करण्यात आला. तर सिंबाला साई मंदिर परिसरात आणण्यात आले. यावेळी साईबाबांची 'ओम साई राम' नावाची शाल देऊन सिंबाचा सत्कार करण्यात आला.

# दावोस येथे १५ लाख ७० हजार कोटींचे सामंजस्य करार करण्यात महाराष्ट्र यशस्वी - उद्योगमंत्री उदय सामंत

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली उद्योग, नगरविकास, एमएमआरडीए, सिडको या विभागाने दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये आजपर्यंतच्या इतिहासात प्रथमच १५ लाख ७० हजार कोटींचे सामंजस्य करार करण्यात महाराष्ट्र यशस्वी झाला आहे, असे उद्योगमंत्री तसेच मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

दावोस येथून परत आल्यानंतर उद्योगमंत्री श्री.सामंत यांनी वांद्रे (पूर्व), मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. उद्योगमंत्री म्हणाले की, मागील दोन वर्षात साडेसात लाख कोटी सामंजस्य करार झाले होते. यात पहिल्या वर्षी एक लाख ३७ हजार कोटी तर दुसऱ्या वर्षी तीन लाख ७० हजार कोटींचे करार करण्यात आले होते. उद्योजकांना जर वेळेत परवानग्या दिल्या, जागा उपलब्ध करून दिली तर उद्योजक गुंतवणूक करून प्रकल्प उभारण्यास तयार असतात. रत्नागिरीमध्ये पुढील दोन चार महिन्यामध्ये कोकाकोलाचे उत्पादन सुरू होत असून पुण्यातही महिंद्रा आणि महिंद्रा प्रकल्प सुरू होत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

उद्योग मंत्री श्री.सामंत म्हणाले की, या संपूर्ण प्रक्रियेमध्ये जवळजवळ ३५ हजार कोटीचे प्रकल्प हे रत्नागिरीमध्ये येत असून त्याच्यामध्ये सेमीकंडक्टरचा एक प्रकल्प २० हजार युवा युवतीला रोजगार मिळवून देणारा आहे. धीरूभाई अंबानी डिफफेन्स क्लस्टर हे अंदाजे दहा ते १४ हजार कोटीचा प्रकल्प रत्नागिरीमध्ये येत असून याद्वारे अनेक लाखो बेरोजगारांना रोजगार मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. अधिक माहिती देतांना श्री.सामंत म्हणाले की, दोन वर्षांपूर्वी आणलेला मैत्री कायदा हा उद्योजकासाठींचा पहिला पारदर्शक कायदा हा महाराष्ट्रामध्ये झाला आहे. आता मैत्री पोर्टलमध्ये आम्ही सुधारणा करीत असून यात एखाद्या अधिकाऱ्याकडे अर्ज केल्यानंतर तो अर्ज किती दिवस थांबलेला आहे आणि तो अर्ज का थांबलेला आहे, याची उत्तर देखील अधिकाऱ्यांना द्यावी लागणार आहे. उद्योजकांना सोयी सुविधा निर्माण केल्यामुळे गेल्या तीन वर्षांमध्ये महाराष्ट्रामध्ये विक्रमी गुंतवणूक येत असल्याचे मंत्री श्री.सामंत यांनी पत्रकार परिषदेदरम्यान सांगितले.

## 'महाराष्ट्राला एनर्जी ड्रिंक्सच्या विळख्यातून वाचवा'

मुंबई : महाराष्ट्र शासनाने ड्रग्ज मुक्त महाराष्ट्र मोहीम हाती घेतली आहे. ही मोहीम सुरू असूनही किराणा माल आणि शाळा कॉलेजच्या आसपास असलेल्या दुकानात कमी किंमतीत उपलब्ध होणारे एनर्जी ड्रिंक हे एखाद्या ड्रग एवढेच घातक आहे. त्यामुळे शाळा कॉलेजच्या आसपास कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी घालावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याकडे केली आहे.

जाहिरातींचे अनुकरण करून तरुण वर्गात दिवसेंदिवस एनर्जी ड्रिंकच्या नावाखाली कॅफेनयुक्त थंड पेय सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. या पेयामुळे आरोग्याला मोठा धोका निर्माण होत आहे. शाळा परिसरात एनर्जी ड्रिंकची सहज विक्री असल्याने शाळेतील मुलांना सहज उपलब्ध होत आहे. तरुण वर्गासोबतच लहान मुले देखील याकडे आकर्षित होत आहेत. शाळा व महाविद्यालय परिसरात कॅफेनयुक्त पेय (एनर्जी ड्रिंक्स) सहज उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांनी सांगितले. एनर्जी ड्रिंक्स १८ वर्षाखालील मुलांनी सेवन करू नये असे लिहिण्यात आलेले असते. मात्र विक्रेते याकडे साफ दुर्लक्ष करून सरसकट या वयातील मुलांनाही एनर्जी ड्रिंक्सची विक्री करतात.

# ग्रामीण भागातील महिलांच्या उत्पादनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांपर्यंत पोहोचवण्यासाठी उमेद अभियान वचनबद्ध - मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर

## महालक्ष्मी ट्रेड सरस मध्ये कोट्यावधींची उलाढाल

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी सुरू असलेल्या अनेक प्रयत्नांना यश येत आहे, उमेद अभियानांतर्गत स्थापित शेतकरी महिला उत्पादक कंपन्यांच्या उत्पादकांना किंवा मालाला योग्य बाजारपेठ मिळावी यासाठी महालक्ष्मी ट्रेड सरस म्हणजेच खरेदीदार आणि विक्री करणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपन्याचे संमेलन सिडको कन्व्हेन्शन सेंटर, वाशी येथे झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) निलेश सागर यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य परिचालन अधिकारी परमेश्वर राऊत, उपसंचालक संदीप जठार, अभियानाचे अवर सचिव धनवंत माळी, उपसंचालक मनोज शेटे यांच्यासह FDRVC चे मुख्य कार्यकारी अधिकारी बिपिन बिहारी आणि कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशी चे उपसचिव उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. निलेश सागर म्हणाले, महिला सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. ग्रामीण भागातील महिलांच्या उत्पादनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांपर्यंत पोहोचवण्यासाठी ठोस उपक्रम राबवले जात आहेत. त्यांच्या उत्पादनांच्या शुद्धता, गुणवत्ता आणि पारंपरिकतेला आम्ही प्राधान्य देत आहोत. तसेच, ई-कॉमर्सच्या माध्यमातून महिला उद्योजकता वाढवण्यासाठी नव्या संधी निर्माण केल्या जात आहेत.

उमेद अभियानाच्या यशस्वी कामगिरीबाबत श्री. सागर म्हणाले, महाराष्ट्रात सध्या ४५० पेक्षा जास्त शेतकरी उत्पादक कंपन्या (FPC) सक्रिय आहेत. आतापर्यंत ५ लाख स्वयं सहाय्यता समूहांना जवळपास १,००० कोटींचा समुदाय निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. बँकांमार्फत ग्रामीण महिलांना ३०,००० कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्रात १९ लाख लखपती दीदी अभियानाने तयार केल्या आहेत असेही श्री.सागर यांनी सांगितले.

उमेद अभियानाचे नवे आयाम

अभियानाचे मुख्य परिचालन अधिकारी श्री. परमेश्वर राऊत यांनी प्रास्ताविकात सांगितले, ङ्गउमेद अभियान हे फक्त ग्रामीण महिलांसाठी आर्थिक मदतीचे साधन नाही, तर त्यांना सन्मान देणारे आणि त्यांच्या कर्तृत्वाला वाव देणारे व्यासपीठ आहे.

उमेद अभियानाचे उद्दिष्ट ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना जागतिक बाजारात पोहोचवणे, शाश्वत विकासाला चालना देणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणे आहे. या अभियानाद्वारे ग्रामीण महिलांचे यश भारताच्या आर्थिक प्रगतीसाठी एक नवा आयाम ठरले आहे.

महालक्ष्मी ट्रेड सरस प्रचंड यशस्वी

राज्यस्तरीय खरेदीदार विक्रेता संमेलन आयोजित करण्यात आले. तसेच राज्यभरात उमेद अंतर्गत स्थापन झालेल्या महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला योग्य वा थेट बाजारपेठ उपलब्ध होऊन योग्य नफा मिळावा ह्या उद्देशाने एक दिवसीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या संमेलनाला हार्वेस्ट प्लसचे, प्रोग्राम मॅनेजर स्वाधीन पटनाईक, ADM चे अमोल धवन,सलाम किसनचे अक्षय खोब्रागडे देहात कंपनीचे अनुराग पटेल असे एकूण विविध कंपनीचे २५ खरेदीदार व ७० महिला शेतकरी उत्पादक यांनी सहभाग नोंदवला.

शेतकरी उत्पादक कंपन्यांनी शेतमालाची खरेदी विक्री करावी हा प्रमुख उद्देश होता. यामध्ये प्रामुख्याने तूर डाळ, चना डाळ, उडीद डाळ, नाचणी, कांदा, तांदूळ , मिरची, हळद यासारखे ३५ उत्पादनाचा समावेश करण्यात आला.

या संमेलनात खरेदी-विक्री मधून दिवसभरात एकूण १.७० कोटी रुपयांची आर्थिक उलाढाल झाली. या संमेलनात झालेल्या वेगवेगळ्या करारांमधून आणि बोलणीतून भविष्यामध्ये ७ ते ८ कोटीची उलाढाल होणे अपेक्षित आहे. या संमेलनाच्या यशस्वीतेसाठी राज्य अभियान व्यवस्थापन कक्षातील सर्वच अधिकारी आणि कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# राज्यस्तरीय राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त लोकसभा व विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांचा शनिवारी सत्कार




मुंबई - महाराष्ट्रामध्ये झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय मतदान दिन २०२५ चे औचित्य साधून मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, एम.आय.टी. विद्यापीठ, पुणे आणि जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हे राज्यस्तरीय पुरस्कार शनिवार, २५ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद सभागृह, एम.आय.टी. कोथरूड, पुणे येथे प्रदान केले जाणार आहेत.

या कार्यक्रमास राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी सुकाणू समितीचे अध्यक्ष प्रो.नितीन करमळकर, ऑलिम्पिक महिला नेमबाज तथा सदिच्छादूत राही सरनोबत, भारतीय क्रिकेटपटू केदार जाधव, एव्हरेस्टवीर उमेश झिरपे, अंतराळ उद्योजक श्वेता कुलकर्णी, सदिच्छादूत श्रीगौरी सावंत, तृतीयपंथी छायाचित्र पत्रकार झोया लोबो, अमुक-तमूक यूट्यब चॅनेलचे ओंकार जाधव व सावनी वझे आणि खास रे टी.व्हीचे संजय कांबळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

राष्ट्रीय मतदान दिनानिमित्तच्या या कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान कार्यक्रम ाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर मतदार जागृती दालन, सेल्फी पॉईंट, मतदार जागृती खेळ आणि पथनाट्याचाही समावेश करण्यात आला आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदार ओळखपत्राचे वाटप कार्यक्रमाबरोबरच शपथ देण्याचा कार्यक्रम होणार आहे.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकसभा तसेच विधानसभा २०२४ मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी, टपाली मतपत्रिकांची देवाण-घेवाण करण्याचे नियोजन, मतदान साहित्य वाटप करून घेण्याचे नियोजन, मतदार सुविधा, वार्तांकन पुरस्कार आणि शासकीय भागीदारी यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल, असे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम तसेच अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.किरण कुलकर्णी यांनी कळविले आहे.

# कॅलिबेल्स अबॅकस आणि ब्रेन जिमद्वारे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील अबॅकस उत्साहात संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**





भारत सरकारद्वारे 'स्टार्टअप इंडिया' मानांकित एकमेव अबॅकस एज्युकेशन प्रोग्रॅम, कॅलिबेल्स अबॅकस अँड ब्रेन जिम मार्फत १९ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय पातळीवरील CALISPRINT- नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशनचे आयोजन केले.छत्रपती संभाजीनगर शहरातील देवगिरी महाविद्यालयामध्ये सदरील कार्यक्रम पार पडला. ६० हून अधिक समर्पित शिक्षकांनी विविध जिल्ह्यांतून येऊन या कार्यक्रमाच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्र आणि गुजरातमधील ३५ जिल्ह्यांमधून ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतल्याने हा कार्यक्रम एक भव्य सोहळा ठरला.

विद्यार्थी आणि शिक्षक हसतमुखाने आणि आनंददायी आठवणींसह घरी परतले, आणि ही स्पर्धा शिक्षण आणि सहकार्याच्या शक्तीचा एक उत्कृष्ट नमुना ठरली. शिक्षकांना देखील बेस्ट अबॅकस टीचर, बेस्ट स्टार्टअप सेंटर, बेस्ट ऑनलाईन सेंटर तसेच बेस्ट क्टिव्हिटी सेंटर असे मानांकन देऊन गौरवण्यात आले. या उल्लेखनीय कार्यक्रम ाला प्राध्यापक सुनील पाडळकर सर, संचालक-महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, प्रा. एस. एस. कादरी सर, अध्यक्ष - जीवन प्रगती वरिष्ठ महाविद्यालय, प्रा. नंदकिशोर गवंडर, अध्यक्ष- संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिटयूट आणि मा. सचिनजी कनकुटे सर, शिक्षक म.न.पा ,श्री. अनिल चव्हाण शिवसेना तालुका प्रमुख, गंगापूर-वैजापूर आदी मान्यवरांची उपस्थिती होती. देवगिरी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे डॉ.अविनाश धोत्रे यांचे प्रमुख वक्ते म्हणून विशेष मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेसाठी मा. आमदार सतीशजी चव्हाण साहेब आणि मा. आमदार रमेश बोरनारे सर यांचे विशेष सहकार्य प्राप्त झाले. सदरील कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी कॅलिबेल्स एज्युकेशन चे डायरेक्टर्स श्री. सुशीलकुमार सोनवणे, श्री. विशाल नौबदे आणि सौ. माया गायकवाड यांनी विशेष मेहनत घेतली. सौ. कांता कनकुटे मॅडम यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मान्यवरांनी व्यक्त केलेल्या विचारांनी सर्वांनाच प्रेरणा दिली. कॅलिबेल्स एज्युकेशन प्रायव्हेट लिमिटेड विद्यार्थ्यांना प्रेरित आणि सशक्त करण्यासाठी, नाविन्यपूर्ण शैक्षणिक कार्यक्रमांच्या माध्यमातून भविष्य घडविण्यासाठी आपले कार्य चालू ठेवत आहे.

राष्ट्रीय पातळीवरील अबॅकस स्पर्धेच्या यशामुळे संस्थेची उत्कृष्टतेसाठी असलेली वचनबद्धता आणि सर्वांसाठी उज्ज्वल भविष्य निर्माण करण्याची दृष्टी अधोरेखित झाली आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816